I.O प्रत ②

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** रेणापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0335 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/09/2024 20:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 20/09/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/09/2024
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/09/2024 **Time (वेळ):** 20:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/09/2024 20:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कामखेडा चौक, ,रेणापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत श्रीरंग दहिफळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नरवटवाडी ता रेणापुर,लातूर ,रेणापूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नरवटवाडी ता रेणापुर,लातूर ,रेणापूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767180445

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव राम कांबळे | | | 1. साने गुरूजी षाळेजवळ,,अवंती नगर, बार्षी रोड,,लातूर ,रेणापूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,500/ | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 23/09/2024

फिर्याद

मी यषवंत श्रीरंग दहिफळे, वय 54 वर्षे, व्यवसाय षेती, रा. नरवटवाडी ता. रेणापुर, जि. लातूर मो.नं. 9767180445, आधार कार्ड नं.993809062568 असा आहे.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन षेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 19/09/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब यांची कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले होते. त्यांनी मला दिनांक 20/09/2024 रोजी 10.00 वा. रेणापुर फाटा येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले होते.

त्याप्रमाणे दिनांक 20/09/2024 रोजी सकाळी 10.00 वा. सुमारास वरीलप्रमाणे संागितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर आले. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचेसमक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे राहणार असुन, मी मौजे नरवटवाडी ता. रेणापुर येथे सन 2016 मध्ये श्री जगन्नाथ देवराव आंबेकर, रा. नरवटवाडी यांचेकडुन 16.6 फुट बाय 62 फुट आकाराचा खुला प्लॉट एक लाख रूपयास खरेदी केला होता. खरेदी केलेल्या प्लॉटची ग्रामपंचायत नरवटवाडी येथे आठ अ रजिस्टरला नोंद होणेकरीता आमचे गावचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी श्री कांबळे यांचेकडे जावुन प्लॉटचे आठ अ ची मागणी केली असता, माझे नावे प्लॉटची ग्रामपंचायत रजिस्टरला नोंद घेवुन आठ अ देण्यासाठी म्हणुन मला 1,500/-रूपय रक्कमेची मागणी केली. सदर रक्कम लाच असल्याची माझी खात्री झाल्याने व लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी तक्रार देण्यासाठी आलो आहे. मी आजरोजी माझे वरील कामासाठी ग्रामसेवक श्री कांबळे यांची भेट घेणार असुन सदर भेटीदरम्यान ग्रामसेवक श्री कांबळे यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेषीर कार्यवाही होणेस विनंती आहे. माझा संबंधीत लोकसेवक यांचेषी कसलाही आर्थिक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही अथवा माझे त्यांचेषी काही वैर नाही.'' अषा आषयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्षÚया केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने मौजे नरवटवाडी ता. रेणापुर जि. लातूर येथील ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी श्री कांबळे यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 12.12 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन पंचायत समिती कार्यालय, रेणापुर येथे ग्रामसेवक श्री काबंळे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक हे पंचायत समिती, रेणापुर परीसरात आडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1

नागरगोजे असे पंचायत समिती कार्यालय, रेणापुर येथे जावुन पांढÚया रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे ग्रामसेवक श्री कांबळे असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली. ग्रामसेवक श्री कांबळे यांनी माझ्ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष माझेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी ग्रामसेवक श्री कांबळे यांना म्हणालो....रामराम... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले...काय म्हणलालतो... त्यावर मी म्हणालो... ती आपल्या कामाचं...रजिस्टरला नोंद घेतलाव का नाही?...कहाय...त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले...अं...घेतलं की त्यादिवषीच... त्यावर मी म्हणालो...आठ अ देताव का आता?....त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले....त्या दिवषी तुम्हाला काय म्हणलो...उगीलेनंबी काय म्हणलां... हजार दिड हजार द्या बाबा... करून घ्या तुम्ही... त्यावर मी म्हणालो... बर आता किती द्यायचे? त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले.... काय त्येन म्हणले तेवढेच द्यायचे.... त्यावर मी म्हणालो.... किती द्यायचे?... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... दिड एक हजार रूपय देवुन टाका... त्यावर मी म्हणालो.... दिड एक हजार? त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले.... हं....त्यावर मी म्हणालो.... चालतयं....त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले...हो...हो... ठिक हाय...या... असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी म्हणालो... येवु का?... असे म्हणालो असता, त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... फोन करा... त्यावर मी ....हो... असे म्हणून मी व पंच क्रमांक 1 नागरगोजे असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12ः25 वाजताचे सुमारास आलोे असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 नागरगोजे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व ग्रामसेवक कांबळे यांच्यात काय बोलणे झाले? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 नागरगोजे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लोकसेवक ग्रामसेवक कांबळे यांच्यात झालेले संभाशण ऐकले. सदर संभाशण हे पंच क्रमांक 1 नागरगोजे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन लोकसेवक ग्रामसेवक कांबळे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 1,500/- रुपये अषी लाचेची स्वतः मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 1,500/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले.

पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला लोकसेवक श्री कांबळे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,500/- रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1687 जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळयातील गमजा काढुन हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईषारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर ग्रामसेवक कांबळे हे पंचायत समिती, रेणापुर येथे कार्यालयात आहेत अथवा कसे याबाबत तक्रारदार यांचे मार्फत माहिती घेतली असता, ग्रामसेवक कांबळे हे मोटेगावला काही कामानिमीत्त गेले असल्याचे व उषीर होणार असल्याचे माहिती प्राप्त झाली. त्यामुळे ग्रामसेवक कांबळे यांचेवर पुढील कार्यवाही करणे षक्य नसल्याकारणाने सदरची सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली. तसेच माझेकडील अॅन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम 1,500/-रू. पंच क्र. 2 सोमवंषी यांचे मार्फत काढुन घेवुन ती सापळा अधिकारी यांनी सुरक्षित ठेवली. त्यानंतर पुढील सापळा कार्यवाही ग्रामसेवक कांबळे हे पंचायत समिती, रेणापुर येथे हजर आल्याची माहिती मिळाल्यानंतर करण्याचे ठरवुन सापळा अधिकारी यांनी सर्वांना गोपनीयतेबाबत योग्य त्या सुचना देवुन सदरची सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली.

आज दिनांक 23/09/2024 रोजी ग्रामसेवक कांबळे हे पंचायत समिती, रेणापुर येथे कार्यालयात हजर आल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा अधिकारी व सापळा पथक हे पंचासह रेणापुर येथे हजर आले. त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून त्यांच्याकडे सुरक्षित ठेवण्यात आलेल्या अॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500/-रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,500/- रुपये पंचासमक्ष माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर गळयातील गमजा हातामध्ये घेणेबाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. त्यानंतर पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 11.41 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन पंचायत समिती कार्यालय, रेणापुर येथे ग्रामसेवक श्री काबंळे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 नागरगोजे असे पंचायत समिती कार्यालय, रेणापुर येथे जावुन लोकसेवक ग्रामसेवक कांबळे यांची भेट घेतली. ते पंचायत समिती, रेणापुर कार्यालयामधुन बाहेर येत होते. चर्चेदरम्यान ग्रामसेवक कांबळे म्हणाले... आणलो का ती

कागदं?.... त्यावर मी म्हणालो... कोणते कागदं... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... रजिस्ट्रीचे झेरॉक्स काय ती... त्यावर मी म्हणालो... तुमच्याकडचं दिल्याय रजिस्ट्रीच... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... बरं ठिवा पंधराषे... त्यावर मी म्हणालो... आठ अ नाही म्हणायलय... थोडया वेळानं... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... बसा ओ... त्यावर मी म्हणालो... नाही गावाला जायचयं हयवका....तुमच कहाय ती घ्या... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... बरं बसा तर थोडं... असे म्हणुन मला ग्रामसेवक कांबळे साहेबांनी त्यांचे चारचाकी गाडीमध्ये बसवुन घेतले व चारचाकी वाहन रेणापुर बस स्टॅन्डच्या दिषेने निघाले. मला ग्रामसेवक कांबळे यांचे चारचाकी वाहनामध्ये बसल्याचे पाहुन पंच क्र. 01 नागरगोजे हे माझे दुचाकीवरुन आम्ही बसलेल्या चारचाकी वाहनाचे पाठीमागे विषिश्ठ अंतरावर येत होते. मी ग्रामसेवक कांबळे साहेब यांना म्हणालो... हं.. कुठं जायचयं नेमकं...मी इथुन जात होतो की, इकडं गावाकडं....असे म्हणुन कामखेडयाकडे जायच्या चौकामध्ये ग्रामसेवक कांबळे साहेब व मी बसलेले चारचाकी वाहन आल्यानंतर मी म्हणालो...उभारू द्या इथचं... कामखेडयाला जायचं....असे म्हणालो. त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले....काय नाव म्हणलो... त्यावर मी म्हणालो... यषवंत श्रीरंग दहिफळे....कोण दिवषी देताव? ही सांगा... त्यावर ग्रामसेवक कांबळे म्हणाले... आज कोणता वार हाय... उद्या देतो कुणाकडं देवु सांगा....त्यावर मी म्हणालो... कुणाकडं बी द्या... असे म्हणुन चारचाकी गाडीतुन खाली उतरून 500/-रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,500/-रुपये लोकसेवक कांबळे, ग्रामसेवक यांचे समोर धरल्या असता, त्यांनी सदरची लाचेची रक्कम ही माझेकडुन 12.24 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष उजव्या हाताने स्वीकारून त्यांच्या अंगातील काळया रंगाच्या पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली. त्यानंतर मी नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. त्यानंतर ग्रामसेवक कांबळे यांनी त्यांचे चारचाकी वाहन रेणापुर फाटयाकडे वळविले व ते वेगाने निघुन गेले. लगेच सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे पंच क्र. 02 सोमवंषी व सापळा पथकातील सदस्यासह माझे जवळ आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी 12.26 वाजण्याच्या सुमारास घेवुन बंद केले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 1 नागरगोजे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 नागरगोजे यांनी सापळा रक्कम ही ग्रामसेवक कांबळे यांनी स्वीकारली असुन, ते लाचेच्या रक्कमेसह रेणापुर फाटयाकडे जात असल्याचे सांगीतले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार व पंच क्र. 01 नागरगोजे यांचे सं◌ागणेप्रमाणे तात्काळ खाजगी वाहनाने ग्रामसेवक कांबळे यांचे चारचाकी वाहनाचे पाठीमागे गेलो. ग्रामसेवक श्री कांबळे यांनी त्यांचे चारचाकी वाहनासह रेणापुर फाटा येथील पेट्रोलपंपावर उभे केले असता, सदर ठिकाणी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व सापळा पथकातील सदस्य गेलो. पंच क्र. 01 नागरगोजे यांनी समोर पांढÚया रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेल्या इसमाकडे हात करून ते ग्रामसेवक कांबळे असल्याचे सापळा अधिकारी यांना सांगीतले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र ग्रामसेवक कांबळे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारून सापळा कार्यवाहीबाबत थोडक्यात सांगीतले असता, त्यांनी त्यांचे नाव महादेव राम कांबळे, वय 46 वर्शे, पद ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, वर्ग-3, नेमणुक ग्रामपंचायत नरवटवाडी, ता. रेणापुर, जि. लातूर रा. साने गुरूजी षाळेजवळ, अवंती नगर, बार्षी रोड, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 2 सोमवंषी यांचे हस्ते लोकसेवक कांबळे यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 नागरगोजे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी सापळा कार्यवाही पडताळणी दरम्यान उगीले नावाच्या इसमाचा उल्लेख आल्याने त्यांचेकडे पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरवुन माझे मोबाईल नंबरवरून मौजे नरवटवाडी ता. रेणापुर येथे पुर्वी असलेले ग्रामसेवक श्री उगीले यांचे मोबाईल नंबरवर पंचासमक्ष कॉल केला असता, ते म्हणाले...ते तुमच तुम्ही काय असल ती बघा की... माझा काय त्यच्यात विशय....आता मला बदली होवुन दहा वर्शे झाली की... असे म्हणुन कोणत्याही प्रकारच्या लाचेची मागणी केलेली नाही अथवा लाच देण्यास सांगीतले नाही. त्यानंतर तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही पुर्ण करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी घटनास्थळावरील योग्य ती कार्यवाही करून पुढील कार्यवाही करणेकरीता लोकसेवक श्री कांबळे, ग्रामसेवक यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील लोकसेवक महादेव राम कांबळे, वय 46 वर्शे, पद ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, वर्ग-3, नेमणुक ग्रामपंचायत नरवटवाडी, ता. रेणापुर, जि. लातूर रा. साने गुरूजी षाळेजवळ, अवंती नगर, बार्षी रोड, लातूर यांनी मी मोजै नरवटवाडी ता. रेणापुर येथे सन 2016 मध्ये खरेदी केलेल्या प्लॉटची ग्रामपंचायत रजिस्टरला नोंद घेवुन 8 अ

देण्यासाठी म्हणुन दि.20/09/2024 रोजी पंचासमक्ष 1,500/-रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आज दि.23/09/2024 रोजी कामखेडा चौक, रेणापुर येथे रोडवर 12.24 वाजण्याच्या सुमारास षासकीय पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे.
म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेषीर तक्रार आहे.
मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**
Pradeep Shivaji Kakade(I (Inspector)) / PCMAH73950 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

(8)



**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Pradeep Shivaji Kak

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PCMAH73950

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन रेणापूर